# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. २१ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ६२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## सहकारातून समृद्धीचा नवा महामार्ग

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या सहकार क्षेत्राला आणि साखर उद्योगाला आगामी काळात एक नवी दिशा आणि मोठी गती मिळण्याचे संकेत मिळाले आहेत. केंद्रीय सहकार मंत्र्यांनी राज्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या दोन मोठ्या प्रकल्पांची घोषणा केली असून, यामुळे प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील सहकार चळवळीला मोठे बळ मिळणार आहे.....

---> अग्रलेख - पान 2 वर

## राज्यातील 90.85 लाख शेतकरी कुटुंबांच्या खात्यात सुमारे ₹1,817 कोटी रक्कम जमा

**मुंबई :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा २३ वा हप्ता माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेब यांच्या हस्ते आज पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर येथून वितरित करण्यात आला. राज्यातील ९०.८५ लाख शेतकरी कुटुंबांच्या खात्यात सुमारे ₹१,८१७ कोटी रक्कम जमा करण्यात आली असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मुंबई येथून कृषी मंत्री दत्तात्रय भरणे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले होते. केंद्र शासनाने शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्नाचा आधार देण्यासाठी फेब्रुवारी २०१९ पासून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे.

# परभणीत काळाचा घाला: यशवाडी मारुती मंदिराचा सभामंडप कोसळून पाच भाविकांचा मृत्यू

## बांबू आणि राजस्थानी दगडांचा ढिगारा अंगावर पडल्याने भीषण दुर्घटना; युद्धपातळीवर बचावकार्य सुरू

**परभणी :** जिल्ह्यातील मानवत तालुक्यातील प्रसिद्ध श्रीक्षेत्र यशवाडी येथे शनिवारी दुपारच्या सुमारास एक अत्यंत दुर्दैवी आणि काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली आहे. कोल्हा शिवारात परभणी ते मानवत रस्त्यावरील ओला शिवारात असलेल्या प्रसिद्ध यशवाडी मारुती मंदिरात शनिवार असल्याने भाविकांची मोठी गर्दी जमली होती. दुपारी तीनच्या सुमारास मंदिराच्या सभामंडपाचे बांधकाम सुरू असताना छताचा आणि गाभाऱ्याचा काही भाग अचानक कोसळल्याने भीषण दुर्घटना घडली. या अपघातात पाच भाविकांचा जागीच मृत्यू झाला असून ३० ते ४० भाविक जखमी झाले आहेत, तर अनेकांची प्रकृती गंभीर आहे. या भीषण घटनेमुळे संपूर्ण परभणी जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून परिसरातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, यशवाडी येथील मारुती मंदिराच्या सभामंडपाचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू होते. या बांधकामासाठी राजस्थान येथील

-> पान 2 वर







### परभणीत मारुती मंदिराचा गाभारा कोसळल्याने पाच भाविकांचा मृत्यू

- परभणी येथील प्रसिद्ध यशवाडी मारुती मंदिरात शनिवारच्या गर्दीदरम्यान सभामंडपाचे बांधकाम सुरू असताना छत कोसळून भीषण दुर्घटना घडली आहे.
- मंदिराच्या बांधकामासाठी वापरण्यात येणारे जड राजस्थानी दगड आणि लाकडी बांबू दर्शन घेणाऱ्या भाविकांच्या अंगावर कोसळल्याने पाच जणांचा जागीच मृत्यू झाला तर अनेक जण गंभीर जखमी झाले.
- प्रशासनाने क्रेन आणि जेसीबीच्या साहाय्याने युद्धपातळीवर बचावकार्य राबवून ढिगाऱ्याखाली दबलेल्या भाविकांना बाहेर काढले आणि उपचारासाठी रुग्णालयात हलवले.
- राज्य सरकारकडून मृतांच्या वारसांना पाच लाख रुपये तर जखमींना एक लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली असून गुत्तेदाराच्या निष्काळजीपणाबाबत चर्चा सुरू आहे.

## थोडक्यात वार्ता

### काँगोमध्ये इबोलाचा कहर: 896 बाधित, 232 जणांचा मृत्यू

**किंशासा :** डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो (डीआरसी)मध्ये इबोला विषाणूचा प्रादुर्भाव गंभीर बनला असून, बाधित रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. सार्वजनिक आरोग्य अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, देशात इबोलाच्या पुष्टी झालेल्या रुग्णांची संख्या ८९६ वर पोहोचली आहे, तर या घातक आजारामुळे आतापर्यंत २३२ जणांचा मृत्यू झाला आहे. आरोग्य मंत्रालयाच्या अहवालानुसार, इटुरी आणि उत्तर किवू प्रांतांमध्ये बुधवारी इबोलाचे २१ नवीन रुग्ण आढळले. त्यापैकी सहा रुग्णांचा मृत्यू झाला आहे. हा उद्रेक आता पूर्व काँगोतील इटुरी, उत्तर किवू आणि दक्षिण किवू या तीन प्रांतांतील ३३ आरोग्य क्षेत्रांमध्ये पसरला आहे. सध्या ३८३ रुग्ण रुग्णालयात उपचार घेत असून त्यांना विलगीकरणात ठेवण्यात आले आहे.

### महिला सक्षमीकरणासाठी महसूल विभागाचा पुढाकार

**मुंबई :** राज्यातील ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, पशुपालनाला चालना आणि शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांना आळा या त्रिसूत्रीवर आधारित महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने घेतला असून, महसूल विभागाच्यावतीने 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना' जाहीर केली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने ही योजना सुरू झाली असून, राज्यातील शासकीय पडीक जमिनी नोंदणीकृत महिला बचत गट, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचे बचत गट आणि 'उमेद/माविम' अंतर्गत येणाऱ्या ग्रामसंघांना नाममात्र एक रुपया दराने भाडेपट्ट्याने दिल्या जाणार आहेत.

### अखेर त्र्यंबकेश्वरवर कृपा ! पावसाची जोरदार हजेरी

**नाशिक :** गेल्या अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या त्र्यंबकेश्वरकरांना आज मोठा दिलासा मिळाला आहे. शनिवारी दुपारी सुमारे चार वाजेच्या सुमारास मृग नक्षत्राच्या पावसाने दमदार हजेरी लावत संपूर्ण परिसराला झोडपून काढले. जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दडी मारल्याने चिंतेत असलेल्या शेतकरी आणि नागरिकांमध्ये या पावसामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदा मान्सून उशिरा दाखल झाल्याने पेरण्यांचे नियोजन रखडले होते. पावसाअभावी बळीराजा हवालदिल झाला होता. मात्र दुपारनंतर अचानक आभाळ दाटून आले आणि काही क्षणांतच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्र्यंबकेश्वर शहरात सध्या तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. पिण्याचे आणि घरगुती वापराचे पाणी मिळवण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे पाऊस सुरू होताच अनेक महिलांनी घराबाहेर धाव घेत छतावरून वाहणारे पावसाचे पाणी ड्रम, बादल्या आणि विविध भांड्यांमध्ये साठवण्यास सुरुवात केली.

### महाराष्ट्रासह मध्य भारतात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई :** गेल्या दोन आठवड्यांपासून देशातील विविध राज्यांमध्ये मान्सूनची प्रगती मंदावली होती, ज्यामुळे पावसाची तूट निर्माण झाली होती. मात्र, आता हवामान विभागाने (IMD) दिलेल्या नवीन अंदाजानुसार, मान्सून पुन्हा एकदा सक्रीय होत असून, ढगांची गर्दी वाढल्याने महाराष्ट्रासह मध्य भारतातील राज्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मध्य भारतात गेल्या काही दिवसांपासून निरभ्र आकाश आणि तीव्र उष्णतेची स्थिती होती. परंतु, आता पावसाला पोषक वातावरण तयार झाले असून, मान्सूनचे ढग पुन्हा जोर धरत आहेत.

## "खरं की काय"






# गणपतीपुळे समुद्रात पर्यटनासाठी गेलेले बिडकीनचे पाच तरुण बुडाले; एकाचा मृतदेह हाती, शोधकार्य सुरु

## देवदर्शनाचा आनंद ठरला शेवटचा; 19 तरुणांच्या गटावर निसर्गाने घातला काळाचा घाला

**छत्रपती संभाजीनगर :** रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटन आणि देवदर्शनाचे स्थळ असलेल्या गणपतीपुळे येथून एक अत्यंत थरकाप उडवणारी आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगर जवळील बिडकीन येथून पर्यटन आणि दर्शनासाठी गेलेल्या १९ तरुणांच्या गटातील पाच जण समुद्रात बुडाल्याची धक्कादायक दुर्घटना घडली आहे. या पाच जणांपैकी एका तरुणाचा मृतदेह शोधण्यात यश आले असून, उर्वरित चार तरुणांचा अथांग समुद्रात

-> पान 2 वर




- रत्नागिरीतील प्रसिद्ध पर्यटनस्थळ गणपतीपुळे येथे समुद्रकिनाऱ्यावर फिरताना बिडकीन येथील पाच तरुण समुद्राच्या तीव्र लाटांचा अंदाज न आल्यामुळे पाण्यात वाहून गेले आहेत.
- बिडकीन येथून भाड्याच्या वाहनाने १९ जणांचा गट देवदर्शनासाठी गेला होता, ज्यामधील आठ जण पाण्यात उतरले असता ही दुर्घटना घडली.
- स्थानिक जीवरक्षकांनी आणि नागरिकांनी तातडीने धाव घेत तिघांना सुखरूप बाहेर काढले, तर खोल पाण्यात वाहून गेलेल्या पाच जणांपैकी एकाचा मृतदेह हाती लागला आहे.
- पोलीस आणि स्थानिक प्रशासनाकडून बेपत्ता असलेल्या इतर चार तरुणांचा शोध घेण्यासाठी समुद्रात युद्धपातळीवर बचावकार्य राबवले जात आहे.

# माजलगावच्या नगरसेविका रेखा आंबुरे यांचे कुणबी प्रमाणपत्र अवैध ठरले

## नगरसेवकपद धोक्यात आल्याने खळबळ



**बीड :** गतवर्षी पार पडलेल्या माजलगाव नगर पालिका निवडणुकीमध्ये ओबीसीसाठी आरक्षीत जागेवर मराठा कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे निवडणुक लढवून विजयी झालेल्या रेखा आंबुरे यांच्या कुणबी प्रमाणपत्रावर पराभूत उमेदवार सुमनबाई मुंडे यांनी आक्षेप घेतला होता. या प्रकरणी सुनावणी होवून जिल्हा समितीकडून कुणबी जात प्रमाणपत्र अवैध असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर हे प्रमाणपत्र जप्त करण्याचे आदेश दिल्याने रेखा आंबुरे यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे.

माजलगाव तालुक्यातील खळवट लिंबगाव येथील मुळ रहिवासी रेखा अंकुशराव आंबुरे, सासरचे नाव रेखा प्रल्हादराव सरवदे यांनी इतर मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध करत इतर मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या वार्डातून माजलगाव नगर पालिका निवडणुक लढवली. या निवडणुकीत त्यांचा विजय झाला. त्यांच्या विरोधात उभ्या असलेल्या सुमनबाई मुंडे यांनी रेखा आंबुरे यांच्या असलेले कुणबी प्रमाणपत्र अवैध असल्याची तक्रार यांनी जात पडताळणी समितीकडे केली होती. या अर्जावर आणि पुराव्यावर सखोल सुनावणी झाली. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेल्या निर्णयानुसार रेखा अंकुशराव आंबुरे यांच्या कुणबी जातीचा दावा नियमानुसार अमान्य करण्यात आला आहे. त्यांचे कुणबी प्रमाणपत्र जप्त करण्याचे आदेश पारित करण्यात आले. सदर निर्णय जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष शरद कुलकर्णी, सदस्य उमेश सोनवणे, सदस्य सचिव श्रावस्ती मिश्राम यांच्या त्रिसदस्यीय समितीने एकमताने कुणबी प्रमाणपत्र अवैध असल्याचा निर्णय दिला. पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि माजलगावचे मुख्याधिकारी यांना अधिकृत प्रत पाठवून दिली. तक्रारदाराच्या वतीने ॲड.विकास मिसाळ यांनी काम पाहिले तर त्यांना ॲड.दीपक कुलकर्णी, ॲड.उदय दराडे यांनी सहकार्य केले. रेखा आंबुरे यांचे कुणबी प्रमाणपत्र अवैध असल्यामुळे त्यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे.

# लोकमान्य टिळक टर्मिनस जवळ भाजप नगरसेवकांनी पकडला गॅस सिलेंडर आणि गुटख्याचा अवैध साठा; महापौराने दिले कारवाईचे सक्त आदेश


**मुंबई :** लोकमान्य टिळक टर्मिनस (एल टी टी ) जवळील स्वराज चौकात शनिवारी २० जून २०२६ रोजी स्थानिक नगरसेवक सुषम सावंत आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी सतर्कता दाखवत अवैध गॅस सिलेंडर आणि गुटखा साठा पकडून दिला. त्यानंतर महापौर रितू तावडे यांनी पोलीस, रेल्वे आणि महानगरपालिका प्रशासन यांना निर्देश देत याप्रकरणी कोणतीही हलगर्जी न करता, या रॅकेटमागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर सक्त आणि अजामीनपात्र कारवाई करावी. टर्मिनस परिसरात गस्त वाढवून , अनधिकृत फेरीवाले आणि अवैध व्यावसायिक यांच्यावर नियमित कारवाई करावी, रस्ते स्वच्छ करावेत, इत्यादी सूचना केल्या आहेत .

मिळालेल्या माहितीनुसार, स्वराज चौक परिसरात मागील काही दिवसांपासून संशयास्पद हालचाली सुरू होत्या. लोकमान्य टिळक टर्मिनस परिसराचा वापर करून अवैध मालाची वाहतूक आणि साठवणूक केली जात असल्याचा संशय स्थानिक नगरसेवक सुषम सावंत यांना आला.त्यानंतर त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह परिसरात पाळत ठेवून धाड टाकली. या कारवाईदरम्यान रस्त्याच्या कडेला उभ्या टेम्पो आणि इतर वाहनांमधून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडर आणि बंदी असलेला गुटख्याचा साठा जप्त करण्यात आला. नगरसेवक सुषम सावंत यांनी या या कारवाईची माहिती महापौर रितू तावडे यांना दिली. त्यानंतर महापौरांनी तत्काळ स्वराज चौकात भेट दिली. जप्त केलेला सिलेंडर आणि गुटखा साठा आणि एकूण परिस्थितीची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या अशा अवैध बाबींवर महापौरांनी तीव्र संताप व्यक्त केला. तसेच, संबंधित पोलिस, रेल्वे आणि महानगरपालिका अधिकारी यांचा पाचारण केले.

# इंग्रजी शिक्षणाच्या नावाखाली धार्मिक दबावाचा खेळ; पुण्याच्या नामांकित शाळेत विद्यार्थिनीवर धर्मांतराचा प्रयत्न

## पालकांच्या तक्रारीनंतर फुरसुंगी परिसरात खळबळ; निष्पक्ष चौकशी करून कारवाईची मागणी

**पुणे :** पुण्यातील फुरसुंगी भागातून एक अत्यंत धक्कादायक आणि गंभीर प्रकार समोर आला आहे. येथील नामांकित 'विबग्योर' शाळेत एका दहावीच्या विद्यार्थिनीवर धार्मिक प्रभाव टाकण्याचा आणि तिला चक्क धर्मांतरासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न झाल्याचा खळबळजनक आरोप पालकांनी केला आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांच्या सुरक्षिततेचा आणि संस्कारांचा प्रश्न किती गंभीर बनत चालला आहे, हेच या प्रकरणावरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे फुरसुंगी परिसरासह संपूर्ण पुणे शहरात पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, विबग्योर शाळेतील एका कर्मचाऱ्याने दहावीत शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीला लक्ष केले होते. हा कर्मचारी संबंधित विद्यार्थिनीशी वारंवार विशिष्ट धार्मिक विषयांवर चर्चा करत असे. एवढ्यावरच न थांबता, त्याने विद्यार्थिनीच्या मनावर धार्मिक पगडा निर्माण करण्यासाठी तिला काही विशिष्ट धार्मिक व्हिडिओ पाहण्याचा सल्ला आणि दबाव दिल्याचा दावाही पालकांनी केला आहे. मुलीच्या वर्तनात बदल जाणवल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. या धक्कादायक प्रकारानंतर संतप्त झालेल्या पालकांनी थेट शाळा प्रशासनाकडे धाव घेत या प्रकरणाची लेखी तक्रार दाखल केली असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

### पुण्याच्या विबग्योर शाळेत विद्यार्थिनीवर धार्मिक प्रभाव टाकल्याचा आरोप

- पुण्याच्या फुरसुंगी येथील विबग्योर शाळेत दहावीच्या विद्यार्थिनीवर धार्मिक प्रभाव टाकून धर्मांतरासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप पालकांनी केला आहे.
- शाळेच्या एका कर्मचाऱ्याने विद्यार्थिनीशी धार्मिक विषयांवर चर्चा करून तिला विशिष्ट व्हिडिओ पाहण्याचा सल्ला दिल्याचे समोर आले असून पालकांनी शाळा प्रशासनाकडे तक्रार केली आहे.
- अशा प्रकारच्या घटना काही नामांकित इंग्रजी शाळांमध्ये वेळोवेळी समोर येत असल्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची प्रशासनाने गंभीर दखल घेण्याची मागणी होत आहे.
- इंग्रजी शिक्षणाच्या नावाखाली चालणाऱ्या कोणत्याही धार्मिक प्रभावाची किंवा दबावाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

मुळात हा केवळ एका शाळेपुरता मर्यादित असलेला विषय नाही. आजकाल काही कॉन्व्हेंट आणि आंतरराष्ट्रीय इंग्रजी शाळांमध्ये अशा प्रकारच्या तक्रारी वेळोवेळी समोर येत असतात. नामांकित शाळांच्या नावाखाली आणि इंग्रजी शिक्षणाच्या आडोशाने लहान मुलांच्या कोवळ्या मनावर विशिष्ट धार्मिक प्रभाव टाकणे किंवा त्यांना धर्मांतरासाठी प्रवृत्त करणे हा एक अत्यंत गंभीर गुन्हा आहे. शिक्षण संस्थांनी केवळ व्यावसायिकतेकडे न पाहता आपल्या आवारात काय चालते आहे, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

या संपूर्ण प्रकरणाकडे आता प्रशासनाने अत्यंत गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. इंग्रजी शिक्षणाच्या नावाखाली जर कोणत्याही प्रकारचा धार्मिक अजेंडा राबवला जात असेल, किंवा विद्यार्थ्यांवर धर्मांतरासाठी छुपा दबाव टाकला जात असेल, तर अशा संस्थांची आणि कर्मचाऱ्यांची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. पालकांनी दाखवलेल्या जागरूकतेमुळे हा प्रकार समोर आला असला, तरी शिक्षण विभागाने आणि पोलिसांनी यात स्वतःहून लक्ष घालून अशा प्रवृत्तींना वेळीच चाप लावणे गरजेचे आहे, तरच शाळांवरील पालकांचा विश्वास टिकून राहील.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## सहकारातून समृद्धीचा नवा महामार्ग

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या सहकार क्षेत्राला आणि साखर उद्योगाला आगामी काळात एक नवी दिशा आणि मोठी गती मिळण्याचे संकेत मिळाले आहेत. केंद्रीय सहकार मंत्र्यांनी राज्यासाठी कोट्यवधी रुपयांच्या दोन मोठ्या प्रकल्पांची घोषणा केली असून, यामुळे प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील सहकार चळवळीला मोठे बळ मिळणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यात उभा राहणारा सहकारी प्रक्रिया सामूहिक प्रकल्प आणि पुण्यातील बंद पडलेल्या 'नॅशनल हेवी इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्ह'चे पुनरुज्जीवन करण्यासाठी जाहीर झालेली मोठी गुंतवणूक, हे दोन निर्णय राज्याच्या सहकार क्षेत्राचा चेहरामोहरा बदलणारे ठरू शकतात. साखर कारखानदारीला केवळ साखरेच्या उत्पादनापुरते मर्यादित न ठेवता, उपउत्पादनांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा या धोरणामागचा मुख्य हेतू असल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी अनेक आर्थिक आणि प्रशासकीय अडचणींचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने घेतलेले काही ऐतिहासिक निर्णय कारखानदारांना आणि पर्यायाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारे आहेत. साखर कारखान्यांवरील प्राप्तीकराचा मोठा बोजा माफ करणे आणि राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळामार्फत हजारो कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देणे, यांमुळे उद्योगाला मोठी नवसंजीवनी मिळाली आहे. बदलत्या काळानुसार साखरेच्या पलीकडे जाऊन इथेनॉल मिश्रण वाढवणे, मल्टीफिड प्रकल्पांना प्रोत्साहन देणे आणि इथेनॉलवरील जीएसटी लक्षणीयरीत्या कमी करणे यांसारख्या धोरणात्मक निर्णयांमुळे कारखान्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. हे पाऊल ग्रामीण भागातील आर्थिक स्थैर्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल. या घोषणेतील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे कोल्हापूर जिल्ह्यात साकारणारा सहकारी प्रक्रिया प्रकल्प होय. अनेक छोटे सहकारी साखर कारखाने भांडवलाअभावी स्वतंत्रपणे सायट्रिक ॲसिड, इथेनॉल किंवा सीबीजी निर्मितीसारखे महागडे प्रकल्प उभारू शकत नाहीत. अशा सर्व कारखान्यांची उपउत्पादने (बाय-प्रॉडक्ट्स) एकत्र करून त्यावर एकाच ठिकाणी प्रक्रिया करण्याची ही संकल्पना अत्यंत कौतुकास्पद आहे. या सामूहिक प्रकल्पातून मिळणारा सर्व आर्थिक नफा पुन्हा सहभागी साखर कारखान्यांना आणि पर्यायाने शेतकऱ्यांना वितरित केला जाणार असल्यामुळे, सहकाराच्या मूळ तत्त्वाला खऱ्या अर्थाने बळ मिळणार आहे. तसेच, पुण्यातील इंजिनिअरिंग को-ऑपरेटिव्हच्या पुनरुज्जीवनामुळे साखर, डेअरी आणि इथेनॉल प्लांटसाठी लागणारी यंत्रसामग्री देशातच तयार होऊन सहकारी क्षेत्राची परकीय तंत्रज्ञानावरील सुटका होईल. महाराष्ट्राची सहकार चळवळ ही केवळ उद्योगांपुरती मर्यादित नसून, ती शेतकरी आणि सर्वसामान्य सभासदांच्या सामूहिक शक्तीवर उभी असलेली एक सामाजिक व्यवस्था आहे. शहरी सहकारी बँकांसाठीची नवी धोरणे, आधार-सक्षम पेमेंट प्रणाली आणि वन-टाइम सेटलमेंट यांसारख्या सुधारणांमुळे ही यंत्रणा अधिक पारदर्शक आणि मजबूत होत आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या या संयुक्त प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील रोजगाराला मोठी चालना मिळेल यात शंका नाही. मात्र, या जाहीर झालेल्या घोषणांची आणि प्रकल्पांची वेळेत व पारदर्शकपणे अंमलबजावणी होणे तितकेच गरजेचे आहे. राजकीय हेतू बाजूला ठेवून जर हे प्रकल्प प्रामाणिकपणे राबवले गेले, तर महाराष्ट्राची सहकार चळवळ संपूर्ण देशासाठी पुन्हा एकदा समृद्धीचे एक आदर्श मॉडेल ठरेल.

# महानगरपालिकेची धडक कर वसुली मोहीम; एका दिवसात १७ मालमत्ता सील, १२.७० लाखांचा कर वसूल

### सर्व 10 झोनमध्ये विशेष कारवाई; 73 थकबाकीदार मालमत्तांना भेटी, मोठ्या थकबाकीदारांवर प्रशासनाचा बडगा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेने मालमत्ता कर वसुलीसाठी शुक्रवारी (२० जून) विशेष मोहीम राबवत थकबाकीदारांविरुद्ध धडक कारवाई केली. महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार सर्व १० झोनमध्ये एकाचवेळी राबविण्यात आलेल्या मोहिमेत ७३ थकबाकीदार मालमत्तांची तपासणी करण्यात आली. यामध्ये १७ मालमत्ता सील करण्यात आल्या असून तब्बल ९२ लाख ७० हजार रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला.

महापालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे व उपआयुक्त विकास नवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कर वसुली मोहीम राबविण्यात आली. यासाठी प्रत्येक झोनमध्ये १५ ते २० मोठ्या थकबाकीदारांची यादी तयार करून संबंधित पथकांना कारवाईचे निर्देश देण्यात आले होते.

झोननिहाय कारवाईत झोन क्रमांक १ मध्ये १० मालमत्तांना भेट देण्यात आली. यामध्ये एका मालमत्तेला सील ठोकण्यात आले तर तीन थकबाकीदारांकडून १३.६० लाख रुपयांचा कर वसूल करण्यात आला.

झोन क्रमांक २ मध्ये एका मालमत्तेवर सीलची कारवाई




करण्यात आली असून १ लाख रुपयांचा कर वसूल करण्यात आला.

झोन क्रमांक ३ मध्ये पाच मालमत्तांची तपासणी करण्यात आली. २५.५४ लाख रुपयांची थकबाकी असलेल्या दोन मालमत्तांना सील करण्यात आले.

झोन क्रमांक ४ मध्ये १० मालमत्तांना भेट देऊन तीन मालमत्ता सील करण्यात आल्या. तसेच तीन थकबाकीदारांकडून ४.६० लाख रुपयांचा कर जमा करण्यात आला.

झोन क्रमांक ५ मध्ये सर्वाधिक कारवाई करत सहा मालमत्ता सील करण्यात आल्या. याशिवाय पाच थकबाकीदारांकडून १९.०९ लाख रुपयांचा कर वसूल करण्यात आला.

झोन क्रमांक ६ मध्ये तीन मालमत्ता सील करण्यात आल्या असून चार थकबाकीदारांकडून १३.६५ लाख रुपयांचा कर जमा झाला. झोन क्रमांक ७ मध्ये तीन मालमत्तांवर सीलची कारवाई करण्यात आली. तसेच ३.७५ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला.

झोन क्रमांक ८ मध्ये १४ थकबाकीदार मालमत्तांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी एका मालमत्तेला सील करण्यात आले असून आठ थकबाकीदारांकडून ३६.७५ लाख रुपयांचा कर वसूल करण्यात आला. या झोनमध्ये सर्वाधिक कर वसुली झाली.

झोन क्रमांक १० मध्ये तीन मालमत्ता सील करण्यात आल्या तर दोन थकबाकीदारांकडून ३ लाख रुपयांचा कर जमा करण्यात आला.

महानगरपालिकेच्या या विशेष मोहिमेमुळे मोठ्या थकबाकीदारांमध्ये खळबळ उडाली असून कर थकविणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# विद्यापीठात अँटी रॅगिंग समिती व पथकाची स्थापना; रॅगिंगविरोधी उपाययोजनांवर भर

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व भयमुक्त शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात अँटी रॅगिंग समिती आणि अँटी रॅगिंग पथकाची स्थापना करण्यात आली आहे. यासंदर्भात विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. १७) व्यवस्थापन परिषद कक्षात बैठक पार पडली.

बैठकीत विद्यापीठ परिसर तसेच संलग्नित महाविद्यालयांमध्ये रॅगिंगला आळा घालण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणे, तक्रारींचे तत्काळ निराकरण करणे आणि रॅगिंगविरोधी नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर विशेष भर देण्यात आला.

कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अँटी रॅगिंग समितीत प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, डॉ. अपर्णा अष्टपुत्रे, डॉ. आनंद देशमुख, डॉ. माधुरी सावंत, उपकुलसचिव डॉ. संजय कवडे यांचा समावेश असून डॉ. कैलास अंभुरे हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकडून आणि त्यांच्या पालकांकडून अँटी रॅगिंग संदर्भातील हमीपत्रे ऑनलाइन भरून घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. संबंधित हमीपत्रे अँटी रॅगिंग कक्षाकडे सादर करण्याचे निर्देश विभागप्रमुखांना देण्यात आले.

### अँटी रॅगिंग पथकाचीही स्थापना

**विद्यापीठ परिसरात रॅगिंगविरोधी कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी प्रा. सुनील नरवडे यांच्या अध्यक्षतेखाली अँटी रॅगिंग पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या पथकात डॉ. सचिन भुसारी, डॉ. मदन सूर्यवंशी, डॉ. अश्विनी मोरे आणि डॉ. श्वेता पाटील यांचा समावेश आहे.**

**विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या रॅगिंगला बळी न पडता त्वरित तक्रार नोंदवावी, असे आवाहन केले असून रॅगिंगमुक्त परिसरासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.**

# परभणीत काळाचा घाला: यशवाडी मारुती मंदिराचा सभामंडप कोसळून पाच भाविकांचा मृत्यू

पान 1 वरून ->

जड व मोठमोठ्या संगमरवरी दगडांचा वापर केला जात होता. शनिवार हा मारुतीचा मुख्य दिवस असल्याने दुपारच्या सुमारास भाविक नेहमीप्रमाणे रांग लावून गाभाऱ्यात दर्शन घेत होते. त्याच वेळी सभामंडपाच्या बांधकामासाठी लावण्यात आलेले लाकडी बांबू आणि जड राजस्थानी दगडी शिळा थेट दर्शनासाठी उपस्थित असलेल्या भाविकांच्या अंगावर कोसळल्या. गाभारा कोसळल्याने मंदिरात एकच गोंधळ, आरडाओरडा आणि पळापळ सुरू झाली. अनेक भाविक या अवजड दगडांच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले, ज्यामध्ये पाच जणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

या दुर्घटनेत संतोष गडदे (राहणार पांगरा), आकाश सुरजसे (राहणार गंगाखेड रोड, परभणी), नुमेश अग्रवाल (राहणार जिंतूर) आणि श्रीकृष्ण बलभीम गवारे चिंचवडगाव (राहणार वडवणी) अशी मयत झालेल्या काही व्यक्तींची नावे समोर आली आहेत. तर अनिकेत संतोष (राहणार मंठा), हनुमान लिपणे, प्रवीण प्रकाश राजबिंडे, नारायण दौलत खरात (राहणार जवळा), दादाराव भांगे (राहणार जवळा), रामकृष्ण भदाडे (राहणार माजलगाव), परमेश्वर कुंडलिक राऊत (राहणार लोणी), केशव गिरी (राहणार देऊळगाव आवचार), नागेश विठ्ठलराव इक्कर (राहणार कुंभारी), प्रवीण रघुनाथ हलगे (राहणार सेलू), नितली सौरभ गजानन कोतकर, ऋषिकेश कोरपेटकर (राहणार नितळी), रामा घुगे आणि रामेश्वर बोंडे (राहणार चिंचोली) अशी जखमींची नावे असून त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात आणि आरपी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. या दुर्घटनेत मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच आमदार राजेश विटेकर, जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण, शिवसेना नेते सईद खान, आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पंकज आंबेगावकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली आणि बचाव कार्यास मदत सुरू केली. दगडी शिळा मोठ्या असल्याने तातडीने जेसीबी आणि क्रेन मागवून ढिगारा उपसण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. पोलीस प्रशासन या घटनेचा पुढील तपास करत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री सहायता निधीमधून मयतांच्या कुटुंबांना पाच लाख रुपयांचे अर्थसाह्य आणि जखमींना एक लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा करण्यात आली आहे. हे संपूर्ण प्रकरण मंदिर बांधकाम करणाऱ्या गुत्तेदाराच्या निष्काळजीपणामुळे घडल्याची संतप्त चर्चा आता भाविक भक्तांमध्ये सुरू झाली आहे.

# मुंबई पाहण्याच्या इच्छेपोटी घरातून निघालेल्या तीन अल्पवयीन मुलांचा २४ तासांत शोध

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** "मुंबई पाहायची आहे" हे स्वप्न मनात बाळगून घरच्यांना न सांगता घरातून निघून गेलेल्या तीन अल्पवयीन मुलांचा शिऊर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत शोध लावून त्यांना सुखरूप पालकांच्या स्वाधीन केले. या यशस्वी कारवाईमुळे पालकांनी सुटकेचा निश्वास टाकत पोलिसांचे आभार मानले आहेत.

शिऊर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तलवाडा येथील १५ ते १६ वर्षे वयोगटातील तीन मुले घरच्यांच्या रागाच्या भीतीने कोणालाही काहीही न सांगता घराबाहेर पडली होती. मुलांचा कोणताही ठावठिकाणा लागत नसल्याने चिंताग्रस्त पालकांनी अपहरणाचा संशय व्यक्त करत १८ जून रोजी शिऊर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुलांचा तातडीने शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार शिऊर पोलिसांनी तीन विशेष पथके स्थापन करून तपास सुरू केला. मनमाड, नांदगाव आणि रोटेगाव रेल्वे स्थानकांवरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली. तांत्रिक विश्लेषणातून मुले रेल्वेने मुंबईच्या दिशेने गेल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर पोलिसांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), भुसावळ आणि दादर रेल्वे नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून मुलांची छायाचित्रे व वर्णन रेल्वे पोलिसांना पाठवले. या माहितीच्या आधारे दादर रेल्वे स्थानक परिसरात फिरत असलेली ही तिन्ही मुले रेल्वे पोलिसांच्या निदर्शनास आली. रेल्वे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतल्यानंतर शिऊर पोलीस पथकाने दादर येथे जाऊन मुलांचा ताबा मिळवला.

पोलिसांच्या तत्परतेमुळे आणि समन्वयपूर्ण प्रयत्नांमुळे तिन्ही मुले सुखरूप सापडली. मुलांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आल्यानंतर कुटुंबीयांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. या कार्यवाहीबद्दल ग्रामस्थांनीही पोलीस प्रशासनाचे कौतुक केले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (वैजापूर) भागवत फुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि वैभव रणखांब, पोउपनि सी. एच. मेंढके तसेच पोलीस अंमलदार थोरात, नरोडे आणि बोरकर यांनी यशस्वीपणे पार पाडली.

# बिडकीनचे पाच तरुण बुडाले; एकाचा मृतदेह हाती, शोधकार्य सुरू

पान 1 वरून ->

शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम राबवली जात आहे. या भयंकर दुर्घटनेमुळे संपूर्ण बिडकीन परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावासह परिसरात तीव्र शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बिडकीन परिसरातील १९ तरुणांनी एकत्र येऊन पर्यटनाचा बेत आखला होता. त्यानुसार एक वाहन भाड्याने करून हे सर्व जण गणपतीपुळे येथे देवदर्शनासाठी आणि फिरण्यासाठी गेले होते. समुद्रकिनाऱ्यावर फिरत असताना आनंदाच्या भरात या गटातील आठ जण समुद्राच्या पाण्यात उतरले. मात्र, त्यांना समुद्रातील पाण्याचा वेग, खोली आणि अचानक येणाऱ्या उंच लाटांचा अजिबात अंदाज आला नाही. अवघ्या काही सेकंदांतच हे आठही जण लाटांच्या तडाख्यात सापडून समुद्रात ओढले जाऊ लागले आणि त्यांनी मदतीसाठी एकच टाहो फोडला.

हा प्रकार समुद्रकिनाऱ्यावरील स्थानिक नागरिक आणि तैनात असलेल्या जीवरक्षकांच्या तात्काळ लक्षात आला. त्यांनी जीवाची पर्वा न करता समुद्रात धाव घेत तातडीने बचावकार्य सुरू केले. जीवरक्षकांनी अत्यंत शर्थीचे प्रयत्न करून त्या आठ जणांपैकी तीन तरुणांना लाटांच्या विळख्यातून सुखरूप बाहेर काढले. मात्र, समुद्राचा प्रवाह अत्यंत वेगवान असल्यामुळे उर्वरित पाच तरुण खोल पाण्यात वाहून गेले. समुद्रात वाहून गेलेल्या तरुणांमध्ये आदित्य संतोष राऊत, अनिकेत बंडू हिवराळे, आनंद राजू नरवडे, प्रेम दीपक आदामने आणि यश रामेश्वर कांबळे यांचा समावेश आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जीवरक्षक, स्थानिक मच्छीमार आणि प्रशासनाकडून समुद्रात मोठी शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. या शोधमोहिमेदरम्यान प्रेम दीपक आदामने या तरुणाचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात यश आले आहे, तर उर्वरित चार बेपत्ता तरुणांचा शोध घेण्याचे काम अद्याप सुरू आहे. या दुर्घटनेतून बचावलेल्या आणि किनाऱ्यावर असलेल्या इतर चौदा तरुणांना प्रशासनाने सुरक्षित स्थळी हलवले आहे. आनंद लुटण्यासाठी गेलेल्या तरुण मुलांचा असा करुण अंत झाल्याची माहिती गावात पोहोचताच बिडकीन गावातील घराघरांमध्ये हळहळ व्यक्त होत असून संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे.

# कचऱ्याच्या आगीत लिंबाचे झाड खाक; उस्मानपुरा-एमआयटी मार्गावरील पर्यावरणाला धोका

### मोकळ्या जागेत कचरा टाकून जाळण्याचे प्रकार सुरूच; नागरिकांकडून कारवाईची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** उस्मानपुरा परिसरातून एमआयटीकडे जाणाऱ्या रस्त्यालगतच्या मोकळ्या जागेत सातत्याने कचरा टाकून त्याला आग लावली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या आगीमुळे परिसरातील एका लिंबाच्या झाडाचा पूर्णतः नाश झाला असून दुसरे झाडही मोठ्या प्रमाणात होरपळले आहे. घटनास्थळी अद्यापही धूर निघत असल्याने कचऱ्याची आग पूर्णपणे विझलेली नसल्याचे दिसून येत आहे.

एमआयटी मार्गालगत असलेल्या या मोकळ्या जागेत काही व्यक्तींकडून घरगुती तसेच इतर प्रकारचा कचरा टाकला जात असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. कचऱ्याचे ढिगारे वाढल्यानंतर त्यांना आग लावली जात असल्याने परिसरात धूर, दुर्गंधी आणि वायुप्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.







घटनास्थळी पाहणी केली असता जळालेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून अजूनही धुराचे लोट निघत असल्याचे आढळून आले. आगीच्या झळा शेजारील लिंबाच्या झाडांपर्यंत पोहोचल्याने एका झाडाचा बुंधा आणि खोड पूर्णपणे जळून काळवंडले असून ते झाड वाळून गेले आहे. दुसऱ्या झाडाच्याही खोडाचा मोठा भाग होरपळल्याचे दिसून आले.

स्थानिक नागरिकांच्या मते, हा प्रकार नवीन नसून अनेक महिन्यांपासून सुरू आहे. कचरा टाकणे, तो जाळणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या धुराबाबत अनेकदा तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र संबंधित यंत्रणांकडून ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना झालेल्या नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

पर्यावरणप्रेमींच्या मते, एका प्रौढ वृक्षाचा नाश होणे म्हणजे अनेक वर्षांच्या नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास होय. शहरातील हरित क्षेत्र आधीच कमी होत असताना अशा घटनांमुळे वृक्षसंपदेचे नुकसान होत आहे. याशिवाय उघड्यावर कचरा जाळल्यामुळे निर्माण होणारा धूर पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. उन्हाळ्यात किंवा कोरड्या हवामानात अशी आग जवळच्या झाडाझुडपांमध्ये पसरल्यास मोठी दुर्घटनाही घडू शकते.

सार्वजनिक जागेत वारंवार कचरा टाकला जात असताना आणि त्याला आग लावली जात असताना संबंधित विभागांकडून प्रभावी नियंत्रण का ठेवले जात नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, परिसराची नियमित स्वच्छता करावी आणि अशा घटनांना आळा घालण्यासाठी देखरेख वाढवावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

दरम्यान, या प्रकारामुळे महानगरपालिका आणि संबंधित यंत्रणांच्या देखरेखीबाबत प्रश्न उपस्थित होत असून पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# NEET (UG) 2026 पुनर्परीक्षेसाठी शहर पोलिसांचा चोख बंदोबस्त; 47 परीक्षा केंद्रांवर 655 हून अधिक अधिकारी-कर्मचारी तैनात

## ड्रोनद्वारे देखरेख, संशयित हालचालींवर पोलिसांची करडी नजर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (NTA), नवी दिल्ली यांच्या वतीने रविवार, २१ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या NEET (UG) 2026 पुनर्परीक्षेसाठी छत्रपती संभाजीनगर शहर पोलिसांनी व्यापक आणि कडेकोट सुरक्षा व्यवस्था उभारली आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी सायंकाळी ४ वाजता शहरातील ४७ परीक्षा केंद्रांवर बंदोबस्ताची रंगीत तालीम घेण्यात आली.

परीक्षेच्या सुरक्षेसाठी शहर पोलीस दलाकडून २ पोलीस उपआयुक्त, ४ सहायक पोलीस आयुक्त, १७ पोलीस निरीक्षक, ५० सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उपनिरीक्षक आणि ५८२ पोलीस अंमलदार असा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. याशिवाय सीआयएसएफचे मनुष्यबळही सुरक्षा व्यवस्थेत सहभागी करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसह परीक्षा केंद्रांची पाहणी करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना आणि मार्गदर्शन केले. परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार होऊ नयेत



यासाठी शहरातील खासगी क्लासेस, झेरॉक्स केंद्रे आणि संशयित ठिकाणांवर पोलिसांची विशेष नजर राहणार आहे.

परीक्षा केंद्रे आणि परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोनचा वापर करण्यात येणार असून, गैरकृत्य करताना आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

परीक्षेसाठी उमेदवारांना सकाळी ११ वाजल्यापासून प्रवेश देण्यात येणार असून दुपारी १.३० वाजता प्रवेश बंद केला जाईल. परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत होणार आहे. दिव्यांग उमेदवारांसाठी परीक्षा वेळ सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे.

दरम्यान, परीक्षेचे गोपनीय साहित्य सुरक्षितपणे वाहतूक व संरक्षण करण्यासाठी ३ पोलीस निरीक्षक, १ सहाय्यक पोलीस आयुक्त, ४ पोलीस उपनिरीक्षक आणि ९४ सशस्त्र पोलीस कर्मचाऱ्यांचे विशेष पथक नियुक्त करण्यात आले आहे.

राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा बंदोबस्त २१ जून रोजी सकाळी ६ वाजल्यापासून कार्यरत राहणार असून, परीक्षा केंद्रांबाहेरील वाहतूक नियंत्रण, परीक्षार्थी व पालकांच्या गर्दीचे व्यवस्थापन तसेच परीक्षा शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# भागशी माता गडाच्या पायथ्याशी रविवारी रंगणार हिंद केसरी बैलगाडा शर्यतीचा थरार

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** बैलगाडा शर्यतीच्या चाहत्यांसाठी रविवारी (दि. २१) एक मोठी पर्वणी ठरणार असून शरणापूर येथील भागशी माता गडाच्या पायथ्याशी भव्य हिंद केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. अखंड भारतातील प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या या मैदानावर देशभरातील नामांकित बैलगाडा चालक, मालक आणि स्पर्धक आपले कौशल्य दाखविणार आहेत.

मराठवाडा, विदर्भ, खानदेश, उत्तर महाराष्ट्र तसेच सर्जेराव पाटील चव्हाण मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा रविवारी सकाळी ७ वाजल्यापासून सुरू होणार आहे. बैलगाडा शर्यतीच्या परंपरेला नवा आयाम देणाऱ्या या स्पर्धेकडे राज्यासह देशातील बैलगाडा प्रेमींचे लक्ष लागले आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख पारितोषिकांची घोषणा करण्यात आली असून प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास तब्बल १ लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. याशिवाय द्वितीय ते दहाव्या क्रमांकापर्यंतच्या विजेत्यांनाही मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.

देशाच्या कानाकोपऱ्यातून सहभागी होणाऱ्या स्पर्धकांमुळे हिंद केसरी मैदानावर चुरशीची लढत पाहायला मिळणार असून बैलगाडा शर्यतीच्या इतिहासात आणखी एक मानाचा अध्याय लिहिला जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ग्रामीण संस्कृती, परंपरा आणि बैलगाडा शर्यतीची समृद्ध परंपरा जपणाऱ्या या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ग्राहकांचा विश्वास हेच आमचे भांडवल; सर्वोत्तम सेवा देण्यास बँक कटिबद्ध – किशोर शितोळे

## जालन्यात देवगिरी बँकेची 34 वी शाखा सुरू

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**जालना :** शहराच्या वाढत्या व्यापारी आणि निवासी विस्ताराला लक्षात घेऊन देवगिरी नागरी सहकारी बँकेने अंबड चौफुली येथे आपली ३४ वी शाखा सुरू केली आहे. या नव्या शाखेमुळे परिसरातील नागरिक, व्यापारी आणि उद्योजकांना आधुनिक व सुरक्षित बँकिंग सेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार आहेत.

शाखेचे उद्घाटन माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा माजी खासदार रावसाहेब पाटील दानवे, विधानपरिषदेचे मुख्य



प्रतोद प्रसाद लाड, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक डॉ. नितीन खंडेलवाल, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत आणि नगरसेवक भास्कर दानवे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना बँकेचे अध्यक्ष किशोरदादा शितोळे यांनी सांगितले की, जालना शहरातील ही देवगिरी बँकेची दुसरी शाखा असून अंबड चौफुली परिसरातील नागरिकांना याचा मोठा लाभ होईल. देवगिरी बँकेला शेड्युल्ड बँकेचा दर्जा प्राप्त असून इंटरनेट बँकिंगसह विविध आधुनिक सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्राहकांचा विश्वास हीच बँकेची खरी ताकद असून विश्वासार्ह आणि दर्जेदार बँकिंग सेवा देण्यासाठी बँक सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास संचालक राजेश जैन, सजनराव मते, सुरेश जगाडे, संचालिका मंगलाताई वाहेगावकर, प्रज्ञाताई तल्हार, अमिताताई लेकुरवाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी रूपेंद्र कोयाळकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन शाखाधिकारी संदीप दांडगे यांनी केले. उद्घाटन सोहळ्यास बँकेचे ग्राहक, व्यापारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वंध्यत्वाच्या अचूक निदानासाठी घाटीत अत्याधुनिक सुविधा उभारणार : डॉ. सुक्रे

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** वंध्यत्वाच्या वाढत्या समस्येच्या पार्श्वभूमीवर अचूक निदानासाठी आधुनिक तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील रिप्रोडक्टिव्ह बायोलॉजी युनिटच्या आधुनिकीकरणासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी दिली.

**घाटीच्या बजाज संकुलात 'वीर्य विश्लेषण :** मूलभूत बाबी आणि वैद्यकीय महत्त्व' या विषयावर शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वंध्यत्वाच्या निदानामध्ये आधुनिक तपासणी पद्धतींचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांच्या हस्ते झाले.

हा कार्यक्रम Association of Physiologists of India च्या महाराष्ट्र शाखेतर्फे आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रमोद बजाज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. वीर्य विश्लेषणाचे वैद्यकीय महत्त्व, वंध्यत्वाच्या निदानातील त्याची भूमिका तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी बोलताना डॉ. सुक्रे यांनी सांगितले की, संस्थेमध्ये रुग्णांना अधिक दर्जेदार व अद्ययावत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सकारात्मक आहे. रिप्रोडक्टिव्ह बायोलॉजी युनिटमध्ये अत्याधुनिक सुविधा उभारण्यासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक, संशोधक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंध्यत्वाच्या अचूक निदानासाठी आधुनिक प्रयोगशाळा सुविधा आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# कोळी समाजजीवनावर आधारित 'कामठा' चे थाटात प्रकाशन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

रामदास पाडळे यांच्या 'कामठा' कादंबरीचा प्रकाशन सोहळा पानवडोदमध्ये उत्साहात पार पडला. ज्या कोळी समाजबांधवांच्या जीवनावर आधारित ही कादंबरी आहे, त्याच समाजामध्ये या पुस्तकाचे प्रकाशन व्हावे असा त्यांचा आग्रह होता. साहित्यिक श्रीकांत उमरीकर यांच्या अध्यक्षतेखाली व जेष्ठ लेखक उत्तम बावस्कर यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. ॲड. मिलिंद महाजन व ज्येष्ठ चित्रकार सरदार जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

'कामठा' ह्या शब्दाचा अर्थ समजून घेताना लक्षात आले की, कोळी समाजातील महिलांचे हे हक्काचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. दगडी पाळ्यावर बसल्यावर छाती एवढी उंच मातीची बांधलेली चूल, त्याच्या पाठीशी बसून व हात गुंडावून (बोटाच्या पेऱ्यांना गव्हाच्या भिजवलेल्या पिठात बुडवून घ्यायचे व त्या बोटांसहित खांद्यांपर्यंत जुन्या कपड्याने गुंडाळून झाकून घ्यायचे) हे सगळे करायचे ते बिब्याला फोडून गोडंबी काढण्यासाठी व नंतर त्याच्या छिलक्याला जाळून तेल काढण्यासाठी. गोडंबी खाताना किंवा बिब्याचे तेल औषधाला वापरताना हे कष्ट लक्षात घेतले तर ह्या समाजातील महिला किती कष्ट करतात ते लक्षात येईल.

अजिंठ्याचा डोंगर हा बिब्यांच्या झाडांसाठी प्रसिद्ध आहे. कोळी समाज, त्यांचे राहणीमान, दैनंदिन व्यवहार, समाजातील त्यांचे स्थान, प्राचीन काळापासून पुजल्या जाणारा त्यांचा देव, मराठवाड्यामध्ये पाणथळ जागा कमी असल्यामुळे त्याच्या समाजाची जंगलातील शिकारीची परंपरा. ह्या सगळ्या नोंदी रामदास पाडळे यांनी खूप उत्कृष्ट पद्धतीने ह्या कादंबरीमध्ये मांडलेल्या आहेत.

महत्वाचे म्हणजे रामदास पाडळे यांनी आपल्या सभोवतालचा परिसर ह्यामध्ये अप्रतिम उभा केला आहे. उंडणगाव, शिवणा, इंद्रगढी, अन्वा, अजिंठा ह्या सगळ्या परिसरामधून लेखक आपल्याला फिरवून तर आणतोच पण त्यासोबत त्या-त्या गावाचे वैशिट्यही सांगत असतो.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे आर्किटेक्ट डॉ. अनिरुद्ध नाईक यांनी पुस्तकावर भाष्य करताना कादंबरी व लेखक यांचा स्वभाव उत्कृष्टपणे उलगडून दाखविला.

जेष्ठ ग्रामीण कथाकार व चित्रकार सरदार जाधव यांनी पाडळे यांच्या साहित्यिक कलाकृतींवर भाष्य नोंदविले तसेच ग्रामीण कथाकारामध्ये जे अंगभूत कौशल्य लेखकानेआपल्या कादंबरीमध्ये कसे चितारले, ते स्पष्ट केले. आ. कृ. वाघमारे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक दगडूलांडगे यांनी आपल्या भाषणात लेखकाच्या शालेय जीवनातील साहित्यावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन ख्यातनाम कवी व गायक राणाजी दौड यांनी केले. परिसरातील ख्यातनाम साहित्यिक कवी धनंजय गव्हाणे, सुरेश घोंगडे, कवी साईनाथ फुसे आदींसह उंडणगाव व पानवडोदमधील साहित्य रसिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नोंदणी व मुद्रांक विभागातील तीन अधिकाऱ्यांच्या बदल्या


**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** नोंदणी व मुद्रांक विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले असून, तीन अधिकाऱ्यांची इतर जिल्ह्यांत बदली करण्यात आली आहे.

यामध्ये कार्यालय क्रमांक २ मधील राजेश राठोड यांची अमरावती येथे बदली करण्यात आली आहे. तसेच कार्यालय क्रमांक ५ मधील अबासाहेब तुपे आणि कार्यालय क्रमांक ३ मधील जगदीश रोजेकर यांची जालना येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, मुंबई येथील नोंदणी कार्यालयातून कृष्णा खताळ यांची बदली छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालय क्रमांक १ मध्ये करण्यात आली आहे.

बदली झालेल्या राजेश राठोड, अबासाहेब तुपे आणि जगदीश रोजेकर यांना कार्यमुक्त करण्यात आले असून, त्यांनी नवीन ठिकाणी रुजू होण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. विभागातील या बदल्यांमुळे प्रशासकीय कामकाजाला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सोयगाव शहरात मोहरमच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीसांचा रुट मार्च



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव, दि.२० जून :** मोहरमच्या पार्श्वभूमीवर शनिवारी(दि.२०) रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास शहरातील विविध भागात सोयगाव पोलीसांनी रूट मार्च केला.यावेळी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले होते. दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी सोयगाव पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही दिले दरम्यान रात्री साडे सात वाजता सुरु झालेला शहरातील रूट मार्च विविध भागातून रात्री साडे आठ वाजेपर्यंत सुरु होता सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी सोयगाव पोलीसांना दंगल नियंत्रण,याव्यतिरिक्त नवनवीन प्रशिक्षण दिले शहरात काही ठिकाणी दंगा काबूचे प्रात्यक्षिक ही करण्यात आले.

यावेळी संदीप सुसर,गजानन दांडगे,अजय कोळी,समाधान बारी,तांगडे साहेब,दांडगे साहेब,शांताराम सपकाळ,माधुरी लोखंडे,प्रियंका बोडखे यांचेसह गृहरक्षक दलाचे जवान सहभागी झाले होते.

# शिवजयंतीच्या जुन्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला; गावठी पिस्तूल, कोयता जप्त

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** सातारा परिसरात शिवजयंतीच्या जुन्या वादातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघा आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 19 जून रोजी मध्यरात्री सुमारे 1.30 वाजण्याच्या सुमारास हायकोर्ट कॉलनी परिसरात फिर्यादी व आरोपी यांच्यात वाद झाला. हा वाद वाढत होळकर चौकापर्यंत पोहोचला. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या मित्रांचा पाठलाग करून मारहाण केली.

या हल्ल्यात प्रशांत घोडके याच्यावर कोयत्याने वार करण्यात आला. वारापासून बचाव करण्याचा प्रयत्न करताना त्याच्या हाताला गंभीर दुखापत झाली. दरम्यान, आरोपींपैकी एक जण गावठी पिस्तूल लोड करत असताना ते हातातून खाली पडल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तेथून एक गावठी पिस्तूल, दोन जिवंत काडतुसे आणि एक कोयता जप्त केला. तसेच फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळी भेट देऊन पुरावे संकलित केले.

या प्रकरणी संघपाल वाटोडे, साई म्हस्के, हर्षवर्धन इंगोले यांच्यासह इतर साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तिघा आरोपींना अटक केली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. घटनेचा अधिक तपास सातारा पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

# बंजारा विकास संघाच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापक लोकचळवळ

## संतोषराव राठोड यांच्या संकल्पनेतून उपक्रमाला प्रारंभ

**फर्दापूर, प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री मा. ना. श्री. संजयभाऊ राठोड यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली बंजारा समाजाच्या एकीकरणासाठी, संघटनात्मक बळकटीसाठी तसेच समाजातील विविध प्रश्नांच्या निराकरणासाठी 'बंजारा विकास संघ' या व्यापक लोकचळवळीची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे राज्यासह देशभरातील बंजारा समाजाला एकत्र आणून सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

देशभरात मोठ्या प्रमाणात विखुरलेला बंजारा समाज हा लोकसंख्येच्या दृष्टीने महत्त्वाचा समाज मानला जातो. देशात या समाजाची लोकसंख्या १५ कोटींपेक्षा अधिक असल्याचे



सांगितले जाते, तर महाराष्ट्रातही सुमारे ३ कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या असल्याचे मानले जाते. एवढ्या मोठ्या समाजाला एकाच धाग्यात बांधून सामाजिक ऐक्य निर्माण करण्याची गरज अनेक वर्षांपासून व्यक्त होत होती. याच पार्श्वभूमीवर मंत्री संजयभाऊ राठोड यांच्या पुढाकारातून बंजारा विकास संघाची स्थापना करण्यात आली आहे. या संघटनेच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणून त्यांच्या समस्या, अडचणी आणि विकासाच्या गरजा शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम केले जाणार आहे. समाजातील नागरिकांची माहिती संकलित करणे, त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणे तसेच शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि प्रशासकीय प्रश्नांवर मार्गदर्शन करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

संघाच्या माध्यमातून सदस्य नोंदणी मोहीम राबविण्यात येणार असून समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सदस्य नोंदणीच्या माध्यमातून समाजबांधवांना एक व्यासपीठ उपलब्ध होणार असून विविध प्रश्नांवर एकत्रितपणे उपाययोजना करण्यास मदत होणार आहे. समाजातील प्रश्न शासन व प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठीही ही संघटना कार्यरत राहणार आहे. बंजारा समाजाच्या सामाजिक उन्नतीबरोबरच शैक्षणिक प्रगती, युवकांना संधी उपलब्ध करून देणे, महिला सक्षमीकरण, रोजगार निर्मिती आणि विविध विकास योजनांचा लाभ समाजापर्यंत पोहोचविणे यावर विशेष भर दिला जाणार आहे. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी समन्वय साधणे हा या लोकचळवळीचा प्रमुख हेतू असल्याचे संघाच्या वतीने सांगण्यात आले. दरम्यान, महाराष्ट्रासह देशभरातील बंजारा समाजबांधवांनी बंजारा विकास संघामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, सदस्य नोंदणी करून सामाजिक चळवळीला बळ द्यावे.

CHANGE OF NAME हिंदू प्रकाशवार्ता

I have changed my Name.

My Old Name was SHAIKH TAHER GAFUR.

Now my NEW NAME is SHAIKH TAHER SHAIKH GAFUR
as per PAN and ADHAR No.
851515840355

# अवैध व अमली पदार्थच्या तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा प्रशासनाचा रायगड जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष समाधान म्हात्रे यांचा इशारा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** जेएनपीटी बंदरातून होणारी अवैध ई-सिगारेट, अमली पदार्थ व इतर प्रतिबंधित वस्तूंची तस्करी रोखून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा दि. २५ जुलै २०२६ रोजी जेएनपीटी बंदरावर आमरण उपोषण आंदोलन करण्याचा इशारा पत्रव्यवहाराद्वारे रायगड जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष समाधान म्हात्रे यांनी प्रशासनाला दिला आहे. या संदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी रायगड यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन सुद्धा दिले आहे.जेएनपीटी बंदरातून होणारी अवैध ई-सिगारेट, अमली पदार्थ



व इतर प्रतिबंधित वस्तूंची तस्करी रोखून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी या संदर्भात जिल्हाध्यक्ष समाधान म्हात्रे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलीस अधीक्षक रायगड, जेएनपीए अध्यक्ष,सीमा शुल्क आयुक्त न्हावा शेवा,महसूल गुप्तचर संचालनालय या ठिकाणी सुद्धा पत्रव्यवहार केला आहे.

समाधान म्हात्रे यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की रायगड जिल्हा तसेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अमली पदार्थाचे सेवन, खरेदी-विक्री, रेव्ह पार्टी आणि विविध प्रकारच्या व्यसनांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. यामुळे युवक, विद्यार्थी आणि नव्या पिढीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून समाजासमोर गंभीर सामाजिक व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

अलीकडेच प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, जेएनपीटी (जवाहरलाल नेहरू बंदर) येथे फर्निचरच्या नावाखाली आयात करण्यात आलेल्या कंटेनरमधून तब्बल ९२.८० कोटी रुपये किंमतीच्या सुमारे १.१६ लाख प्रतिबंधित इलेक्ट्रॉनिक सिगारेट (व्हेप्स) जप्त करण्यात आल्या आहेत. सदर कारवाई महसूल गुप्तचर संचालनालय (DRI) व सीमाशुल्क विभागाने केली असल्याचे वृत्तात नमूद आहे. फर्निचर असल्याचे घोषित केलेल्या मालामध्ये ई-सिगारेट लपवून तस्करी करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे उघड झाले आहे.

ही घटना अत्यंत गंभीर असून बंदरातून अवैध माल देशात कसा प्रवेश करतो, याबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर तस्करीचा प्रयत्न होत असताना संबंधित व्यापारी, आयातदार, क्लिअरिंग एजंट, बंदरातील अधिकारी व इतर संबंधित घटकांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच अशा मालाला परवानगी देणारे किंवा दुर्लक्ष करणारे अधिकारी यांचीही जबाबदारी निश्चित करून त्यांच्या संपत्तीची व आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यात यावी. अशी मागणी समाधान म्हात्रे यांनी केली आहे. मागणी मान्य न झाल्यास अथवा तस्करी करणाऱ्या संबंधितांवर त्वरित कठोर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरदचंद्र पवार पक्षाचे रायगड युवक जिल्हाध्यक्ष समाधान म्हात्रे यांनी प्रशासनाला दिला आहे.

## कांचन रावळकर यांची मुंबई पोलीस दलात निवड; गुलाबराव पाटील कोलते व ग्रामस्थांनी केला सत्कार



**सावळदबारा प्रतिनिधी :** सावळदबारा येथील साहेबराव रावळकर यांची कन्या कांचन साहेबराव रावळकर यांची मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. या यशाबद्दल गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून गावातून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. तसेच गावकऱ्यांनी कांचन रावळकर यांचा सत्कार करून अभिनंदन केले.

सावळदबारा येथील साहेबराव रावळकर यांची कन्या कांचन रावळकर यांनी मुंबई पोलीस दलात स्थान मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन पुष्पगुच्छ देत सत्कार केला. यावेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते,साहेबराव रावळकर,सरला रावळकर, मयुर रावळकर, पंजाबराव रावळकर,प्रभू सूर्यवंशी, शाताराम खराटे, राजू खराटे, संजय रावळकर, विजय रावळकर, मुकेश रावळकर, भावेश रावळकर, योगेश रावळकर,आदी उपस्थित होते. सावळदबारा ता. सोयगाव येथील कांचन साहेबराव रावळकर यांची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल सत्कार करताना भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी केला.

# संशयित दहशतवादी हालचालीच्या पार्श्वभूमीवर छापेमारी सुरू

## परभणीत पहाटेपासूनच एटीएस ची मोठी कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** शहरात शनिवार 20 जून रोजी पहाटे सात वाजल्यापासून सुरक्षा यंत्रणांनी अत्यंत गोपनीय आणि गुप्तपणे मोठी कारवाई सुरू केली आहे एटीएस कडून शहरातील विविध 15 ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आली आहेत





मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार या कारवाईमध्ये एकूण 26 जणांचे पथक कार्यरत असून शहरातील 15 वेगवेगळ्या ठिकाणी तपास सुरू शहरातील धार रोड परिसरातील मुमताज कॉलनी विटीच्या पथकाकडून छापेमारी सुरू असल्याने या ठिकाणी एटीएसचे पथक व परभणीतील पोलीस मोठ्या प्रमाणात दाखल झाले असून या ठिकाणी अक्षरशः छावणीच्या स्वरूप आले आहे तसेच जनता मार्केटमध्येही असलेल्या राजकोट स्वीट्स च्या बाजूला असलेल्या एका मशिनरीच्या दुकानावर तसेच नोबल हॅन्डलूम अँड होजीअरी या दुकानाजवळ पथकाने धाड टाकली चे समजते आहे सदरची ही कारवाई संशय दहशतवादी कारवाया संशयास्पद आर्थिक व्यवहार (टेरर फंडिंग ) किंवा देश विरोधी कृत्याशी संबंधित असल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे बाहेरून आलेले असल्याचे स्थानिक पातळीवर कमालीची गुप्तता पाळली जात आहे या कार्यवाहीमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण कसले असून उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे या छापेमारी बाबत अधिकृत यंत्रणेकडून अद्याप कोणतेही माहिती देण्यात आलेली नाही तपास कार्य पूर्ण झाल्यानंतरच या कार्यवाहीचा सविस्तर खुलासा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सदन कारवाई करण्याकरता क्रुझर गाड्यांमधून बाहेर गावचे अधिकारीदाखल झाले असून या गाड्यांमध्ये प्रत्येक गाडीवर एबीसीडी अशाप्रकारे मार्किंग करण्यात आली होती सदर कारवाई अत्यंत गोपनीय पद्धतीने व गुप्तपणे चालू आहे त्यामुळे सदरील पथकाला यातून काय निष्पन्न झाले किंवा काय हाती लागले तेच काही समजू शकले नाही.

### महावितरणच्या गलथान कारभाराने घेतला बळी?

## गजाननगरातील भीषण आगीत महिलेचा होरपळून मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** गजानननगर परिसरातील चिंतामणी दुकानाजवळ पहाटेच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. मात्र हा केवळ अपघात आहे की महावितरणच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभाराचा बळी, असा संतप्त सवाल आता स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शनिवारी पहाटे अचानक शॉर्टसर्किट झाल्याने घराला आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि घरातील सिलेंडरचा स्फोट झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या दुर्घटनेत सुनंदा राजेंद्र मोरे यांचा होरपळून मृत्यू झाला, तर कुटुंबातील इतर सदस्यांना स्थानिक नागरिक आणि बचाव पथकाच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात आले. घटनेनंतर परिसरातील नागरिकांचा संताप अनावर झाला. अनेक दिवसांपासून परिसरात धोकादायक पद्धतीने लटकलेल्या वीजतारा आणि वारंवार करण्यात आलेल्या तक्रारींकडे महावितरणने दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आग लागल्यानंतरही वेळेत वीजपुरवठा खंडित करण्यात आला नसल्याने बचावकार्यात अडथळे निर्माण झाले आणि महिलेचा जीव वाचविण्याची संधी हुकली, अशी तीव्र भावना स्थानिकांनी व्यक्त केली.

घटनेची माहिती मिळताच उपमहापौर राजेंद्र जंजाळ, नगरसेवक अशोक दामले, पुष्पा निरपगारे तसेच प्रशासनातील अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दल, पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. मात्र आता प्रश्न असा आहे की, परिसरातील धोकादायक वीजजाळ्याबाबत वारंवार सूचना मिळूनही महावितरण झोपेत होते का? निष्काळजीपणामुळे एका महिलेचा बळी गेला असेल तर त्याची जबाबदारी कोण घेणार? या दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. गजानननगरातील या दुर्दैवी घटनेने पुन्हा एकदा शहरातील वीजसुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणला असून प्रशासन आणि महावितरणच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## फर्दापूर येथे मोहरम निमित्ताने गावात करण्यात आले रुट मार्च



**फर्दापूर :** फर्दापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मोहरम सणा निमित्ताने उपविभागीय पोलिस अधिकारी एस पी कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली फर्दापूर पोलिस स्टेशन चे सहा पोलीस निरीक्षक सुधीर मोटे तसेच पोलिस कर्मचारी होमगार्ड यांच्या फर्दापूर गावात रुट मार्च करण्यात आला

# नीट परीक्षेसाठी ग्रामीण पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त; ड्रोनद्वारे ठेवणार नजर

### कन्नड व फुलंब्रीतील तीन परीक्षा केंद्रांवर 1,272 विद्यार्थी देणार परीक्षा; बॉम्बशोधक पथकाकडून तपासणी पूर्ण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET) रविवारी (दि. 21) पार पडणार असून, परीक्षेची गोपनीयता, पारदर्शकता आणि सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी कडेकोट बंदोबस्ताची तयारी पूर्ण केली आहे. गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रथमच ड्रोन कॅमेऱ्यांच्या माध्यमातून परीक्षा केंद्रांवर विशेष निगराणी ठेवण्यात येणार आहे.



ग्रामीण पोलीस हद्दीतील संत तुकाराम महाविद्यालय, कन्नड, राजर्षी शाहू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाथ्री (ता. फुलंब्री) आणि राजर्षी शाहू आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, डोंगरगाव कवाड (ता. फुलंब्री) या तीन केंद्रांवर परीक्षा होणार आहे. या केंद्रांवर एकूण १ हजार २७२ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी सर्व केंद्रांवरील बंदोबस्ताचे नियोजन पूर्ण केले असून, अधिकारी व अंमलदारांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने बॉम्बशोधक व नाशक पथकाने (BDDS) परीक्षा केंद्रांच्या इमारती व परिसराची सखोल तपासणी करून परिसर सुरक्षित घोषित केला आहे.

परीक्षेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तिन्ही केंद्रांवर मोठ्या प्रमाणात पोलीस अधिकारी, कर्मचारी व होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. तसेच ड्रोनद्वारे संपूर्ण परिसरावर लक्ष ठेवण्यात येणार असल्याने संशयास्पद हालचालींवर तत्काळ कारवाई करणे शक्य होणार आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी विद्यार्थ्यांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आत्मविश्वासाने परीक्षा देण्याचे आवाहन केले आहे. "नीट परीक्षा विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून सुरक्षित व पारदर्शक वातावरणात परीक्षा पार पडावी यासाठी ग्रामीण पोलीस दल पूर्णपणे सज्ज आहे. विद्यार्थ्यांनी केवळ आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून निर्भयपणे परीक्षा द्यावी," असे त्यांनी सांगितले.

## दोन मुलांच्या अपहरणाचा प्रयत्न आईच्या सतर्कतेमुळे फसला

### रोहिला पिंपरी येथील घटना

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** शेतातून काम करून घेऊन परत येणाऱ्या दोन मुलांचा अप अपहरणाचा प्रयत्न आईच्या सतर्केमुळे फसल्याचा प्रकार दिनांक 18 जून रोजी सायंकाळी पाच वाजता घडला. याबाबत बोरी पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की जिंतूर तालुक्यातील रोहिदास पिपरी येथील शेतकरी ज्ञानदेव मारोतराव गलांडे यांची पत्नी व त्यांचा मुलगा स्वराज व सुरज हे गट क्रमांक 162 मधून आपल्या आईसह घरी परत येत असताना त्यांनी मुलाचा शंभर मीटर पाठलाग करून मुलाला उचलून कार मध्ये टाकण्याचा प्रयत्न केला असता आईने आरडाओरडा करून जवळच्या शेतकऱ्यांना बोलवण्याचा प्रयत्न केला आरडाओरडा मुळे जवळली शेतात काम करणारे शेतकरी नवनाथ खोकले अनंत गलांडे बाजीराव गलांडे धावल्यामुळे हल्लेखोर पळून जात असताना पाठलाग करून पकडण्याचा प्रयत्न केला. व घटनेची पोलीस स्टेशन ला कळवली.या घटनेतील पोलिसांनी तीन कार पोलिसांना ताब्यात घेतले असून ज्ञानदेव मारोतराव गलांडे यांच्या फिर्यादीवरून एकूण 13 आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे यातील 12 आरोपींना पोलिसांनी जिंतूर कोर्टात हजर केले या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक एन एस थोरवे हे करीत आहे

## अवघ्या 13 व्या वर्षी वरदची नेमबाजीत राष्ट्रीय झेप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी नेमबाजीच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत शहरातील युवा नेमबाज वरद थोरात याने प्री-नॅशनल स्पर्धेत प्रवेश मिळवला आहे.

महाराष्ट्र रायफल असोसिएशनतर्फे मुंबईतील वरळी येथील एमआरए रेंजवर आयोजित २९ व्या कॅप्टन एस. जे. इझेकियल मेमोरियल महाराष्ट्र राज्य नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत (नवोदित गट) त्याने ही कामगिरी केली. एअर पिस्तूल सब-युथ पुरुष गटात स्पर्धा करताना वरदने ४०० पैकी ३४२ गुणांची नोंद केली. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याने प्री-नॅशनल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. विशेष म्हणजे, नेमबाजीचे प्रशिक्षण सुरू करून अवघे दोन महिने पूर्ण होत असतानाच त्याने हे यश संपादन केले आहे. वरद हा छत्रपती संभाजीनगर येथील लॉक एन लोड शूटिंग अरेना येथे प्रशिक्षण घेत आहे. त्याला आंतरराष्ट्रीय पिस्तूल नेमबाज, भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे (SAI) प्रशिक्षक, राष्ट्रीय ज्युरी तसेच विश्वचषक आणि आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतील पदकविजेते सुमेध कुमार यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षक चिन्मय देशपांडे यांनीही त्याच्या तांत्रिक तयारीसाठी विशेष मेहनत घेतली. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि प्रशिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनामुळे वरदने अल्पावधीतच राज्यस्तरावर आपली छाप उमटवली आहे. त्यामुळे आगामी प्री-नॅशनल स्पर्धेतही त्याच्याकडून दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वरदच्या या यशाबद्दल माजी स्थायी समिती सभापती दिलीप थोरात, नगरसेविका कमला थोरात, उमेश देशपांडे यांच्यासह क्रीडा व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**दोन महिन्यांत मोठी कामगिरी :** नेमबाजीसारख्या अत्यंत तांत्रिक खेळात केवळ दोन महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर राज्यस्तरीय स्पर्धेत प्री-नॅशनल पात्रता मिळवणे ही दुर्मिळ बाब मानली जाते. वरद थोरातच्या यशामुळे संभाजीनगरच्या नेमबाजी क्षेत्राला नवी आशा मिळाली आहे.

# बोरगावात हौसे, नवसे व गवशे निवडणूक रिंगनात ?

**खुलताबाद :** तालुक्यात ग्रामपंचायत निवडणूक वॉर्ड निहाय आरक्षण जाहीर झाले. सरपंच मागासवर्गीय महिला जनतेतून आहे. वॉर्ड क्रमांक एक मध्ये एक जागा सर्वसाधारण महिला व दोन सर्वसाधारण पुरुष राखीव आहे. वॉर्ड दोन मध्ये

मागास वर्गीय (अ. जा.) महिला आणि सर्वसाधारण महिला एक, वॉर्ड तीन मध्ये ओबीसी महिला तर सर्वसाधारण महिला यांना प्रत्येकी एक जागा, वॉर्ड चार मध्ये ओबीसी महिला व सर्वसाधारण महिला तसेच एक सर्वसाधारण पुरुष आरक्षित करण्यात आले आहेत. वॉर्ड क्रमांक पाच मध्ये सर्वसाधारण महिला, व सर्वसाधारण पुरुष, ओबीसी महिला असे प्रत्येकी एक जागा राखीव ठेवण्यात आली आहे. जागा राखीव होतच बोरगावात, हॉटेलवर, चहाच्या टपरिवार हौसे, नवसे व गवसे या सर्वांची रेलचेल वाढल्यामुळे हॉटेल व चहाच्या टपरी मालकाचा उन्हाळ्यातही धंदा जोरात सुरु झाला आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की गल्लेबोरगाव येथे वार्ड निहाय आरक्षण सोडत झाली आहे.त्यामुळे या सर्वांचे राजकीय समीकरण आता बदलले आहे. दोन पॅनल ऐवजी तीन पॅनल स्वघोषित जाहीर असल्याचे दिसत असतानाच चौथ्या पॅनलची चर्चा रंगत आहे.

हौस करणारे हौसे ?

वयाच्या एकोनावीस वीस वर्ष ते चालीस वर्षा पर्यंत काहीजनाना शिक्षणाचा, समाजसेवेचा व राजकीय गंध नसतानाही तसेच स्व कुटुंब न सांभाळणारे गाव सांभाळतील अशी चर्चा रंगत आहे. अशा रंगत शब्दानी निवडून विजयी होणारे हौशे?

नवशे. एकदाही निवडून
न येणारे नवसे

मतदाराने एकदाही निवडून न देनारे. तसेच त्यांना मतदाराने नाकारले तरीही पुन्हा निवडणूक रिंगणात उतरणार आहे. कारण आम्ही मतदाराचे, गाव कऱ्यांचे,समाज बांधवाचे तसेच स्वतःच्या वॉर्डचे रस्ते, नाते, लाईट, पाणी वेळेवर आहे कि नाही याबाबत तीस वर्ष याकडे कधीही लक्ष न देणारे तरुण पुरुष स्त्री गावकऱ्याच्या समस्याकडे लक्ष देतील हे नवशे!!

गवसे गावाला गवसनी घालून गाव वसवणारे गवसे!!

माझं गाव माझ वतन माझी धरती, कन्या समजणारे

गावाला गवसनी घालून गावकऱ्याच्या समस्याना मार्गस्थ लावण्याचा प्रयत्न करणारे नवशे तून नाही तर हजारातून एक! गवसे !!

# मराठवाडा कन्येची जागतिक पातळीवर सुवर्णभरारी; आंतरराष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेत चमकली वंशिका कांबळे

## भारतीय महिला संघाला मिळवून दिले सुवर्णपदक; मराठवाड्यातून कौतुकाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रातून एक अत्यंत अभिमानास्पद आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. भूतान येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या कन्येने जागतिक पातळीवर आपल्या राज्याचे आणि देशाचे नाव सुवर्णअक्षरांनी कोरले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील प्रतिभावान खेळाडू वंशिका उज्वला अनिल कांबळे हिने भारतीय महिला संघातून खेळताना अत्यंत उत्कृष्ट आणि यशस्वी खेळाचे प्रदर्शन करत देशाला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. तिच्या या ऐतिहासिक कामगिरीमुळे संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड होणे हीच एक मोठी अभिमानाची गोष्ट होती, त्यातही विशेष बाब म्हणजे संपूर्ण मराठवाड्यातून एकमेव महिला खेळाडू म्हणून वंशिका कांबळे हिची निवड झाली होती. तिने या निवडीचे सोने करत जागतिक मंचावर आपल्या कौशल्याची चुणूक दाखवून दिली. वंशिकाची ही कामगिरी अचानक झालेली नाही, तर यापूर्वी तिने पाच वेळा राज्यपातळीवर आणि चार वेळा राष्ट्रीय पातळीवर खेळताना अत्यंत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे.



पारंपरिक आणि मातीतील खेळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आट्यापाट्या या खेळाला आपले करिअर म्हणून निवडण्याचा एक धाडसी आणि कौतुकास्पद निर्णय तिने घेतला असून, आज तिने या निर्णयातून स्वतःला सिद्ध करून दाखवले आहे.

जागतिक पातळीवर सुवर्णपदक पटकावून मायदेशी परतलेल्या या मराठवाडा कन्येवर संपूर्ण महाराष्ट्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. मराठवाड्याच्या मातीतील खेळाडूने आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या या घवघवीत यशामुळे स्थानिक क्रीडाप्रेमींमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे. तिच्या या यशाची दखल घेऊन विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून तिचे कौतुक केले जात आहे.

### भूतानमधील आंतरराष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेत वंशिका कांबळेला सुवर्णपदक

- भूतान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या वंशिका कांबळे हिने भारतीय महिला संघातून खेळत सुवर्णपदक जिंकले आहे.
- या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी संपूर्ण मराठवाड्यातून निवड झालेली ती एकमेव महिला खेळाडू ठरली आहे.
- वंशिकाने आतापर्यंत पाच राज्यपातळीवर आणि चार राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आट्यापाट्या खेळाला आपले करिअर म्हणून निवडले आहे.
- या ऐतिहासिक सुवर्ण यशाबद्दल मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाच्या वतीने तिच्या निवासस्थानी जाऊन तिचा विशेष सत्कार करण्यात आला.

वंशिका ही मराठवाड्यातील खेळाडू असल्यामुळे तिच्या या यशाचा गौरव करण्यासाठी मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाच्या वतीने एक विशेष उपक्रम राबवण्यात आला. महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी थेट वंशिकाच्या निवासस्थानी जाऊन तिचा विशेष सत्कार केला आणि पाठिवर कौतुकाची थाप दिली. या गौरव सोहळ्याप्रसंगी श्री विलास शेकुजी पाटील, दादाराव गवळी, कैलास गाडगे, प्रविण शिंदे, विलास पाटील (परतूर) यांच्यासह मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष मास्टर अनिल कांबळे आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंशिकाचे हे यश ग्रामीण भागातील इतर खेळाडूंनाही क्रीडा क्षेत्रात मोठी झेप घेण्यासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911